**ठळक बातम्या**

- राज्यातल्या तीर्थक्षेत्र आणि पर्यटनस्थळ विकासाच्या सुमारे ३०५ कोटी ६३ लाख रुपयांच्या आराखड्यांना राज्य सरकारची मंजुरी

- मुंबई महानगर क्षेत्रातल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश/ पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ३ हजार ८३८ कोटींच्या अर्थसंकल्पाला मंजुरी

- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर ५ ऑक्टोबरला चाचणीसाठी विमान उतरवण्याची सिडकोची तयारी

**आणि**

- गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेजवळ पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत रुपेश मडावीसह ३ नक्षलवादी ठार

**<><><><><>**

राज्यातल्या विविध तीर्थक्षेत्र आणि पर्यटनस्थळ विकासाच्या सुमारे ३०५ कोटी ६३ लाख रुपयांच्या आराखड्यांना सरकारनं मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत ही मंजूरी देण्यात आली. यात पंढरपूरमधे विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात भाविक आणि पर्यटकांसाठी दर्शन मंडप आणि दर्शन रांगेची सुविधा निर्माण करण्यासाठी १२९ कोटी ४९ लाख रुपयांच्या कामांचा समावेश आहे.

त्याशिवाय जळगाव जिल्ह्यात अमळनेर इथल्या मंगळग्रह देवस्थानासाठी २५ कोटी, सातारा जिल्ह्यात कोयना जलाशय-मौजे मुनावळे इथल्या जलक्रीडा पर्यटन सुविधेसाठी ४७ कोटी, अमरावती जिल्ह्यात दर्यापूर इथं संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी ऋणमोचन विकासाकरता १८ कोटी, बीड जिल्ह्यात गहिनीनाथ गडासाठी २ कोटी ६७ लाख, मुंबईवरच्या दहशतवादी हल्ल्यात अजमल कसाब या दहशतवाद्याला पकडणाऱ्या शहीद तुकाराम ओंबळे यांच्या सातारा जिल्ह्यातल्या केंडबे गावी स्मारक उभारण्यासाठी १५ कोटी, नागपूर शहरात लक्ष्मीनारायण शिवमंदिर- नंदनवनासाठी २४ कोटी ७३ लाख, कुत्तेवालेबाबा मंदिर आश्रम -शांतीनगरसाठी १३ कोटी ३५ लाख, तर मुरलीधर मंदिरासाठी १४ कोटी ३९ लाख रुपयांच्या तरतुदीला समितीनं मान्यता दिली.

**नाशिक** जिल्ह्यात भगूर इथं स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर आधारित थीमपार्कसाठी चाळीस कोटी रुपयांच्या प्रस्तावाला, तसंच पहिल्या टप्प्यातल्या १५ कोटी रुपयांच्या तरतुदीलाही मान्यता देण्यात आली.

**<><><><><>**

मुंबई महानगर क्षेत्रातलं दळणवळण, पायाभूत सुविधा, आणि आर्थिक विकास वाढवण्याच्या प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. एमएमआरडीएच्या माध्यमातून सुमारे अडीच लाख कोटींची विकास कामे सुरू असून ती कालमर्यादेत पूर्ण करावीत, असंही ते म्हणाले. बॅकबे रिक्लेमेशन प्रारूप विकास आराखडा, बदलापूर ते विरार-अलिबाग

मल्टीमोडल कॉरीडॉर प्रवेश नियंत्रित महामार्गासाठी सल्लागाराची नेमणूक आदी विषयांना यावेळी मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली. बॅकबे रिक्लेमेशन योजनेचा सुधारित प्रारुप आराखडाही यावेळी मंजूर झाला.

**<><><><><>**

पुणे शहराची सांस्कृतिक शहर म्हणून ओळख कायम ठेऊन शहराचा विकास व्हावा, अशी सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. ते आज मुंबईत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बैठकीत बोलत होते. यावेळी प्राधिकरणाच्या ३ हजार ८३८ कोटी ६१ लाख रुपयांच्या अर्थसंकल्पाला मंजुरी देण्यात आली. ५ कोटी ७५ लाखांचा शिलकीचा हा अर्थसंकल्प आहे.

नवीन विकसित होणाऱ्या भागात मोकळ्या जागा राहतील, याची काळजी घ्या. पुण्यातलं कव्हेशन सेंटर जागतिक दर्जाचं होण्यासाठी नियोजन करा, गुंठेवारी अधिनियमातल्या नियमितीकरणाचं शुल्क कमी करुन नागरिकांना दिलासा द्या, हे शुल्क भरण्यासाठी ३१ मार्च पर्यंत विशेष सवलत द्या, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. प्राधिकरणाच्या १ हजार ६२० घरांची सोडत लवकरच काढण्याचे तसंच दुसऱ्या टप्प्यातल्या ६ हजार घरांच्या बांधकामाला वेग देण्याचे आदेश त्यांनी दिले.

**<><><><><>**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांचं आज नागपूर इथं आगमन झालं, रेशीमबाग इथं सुरेश भट सभागृहात त्यांची भाजपा कार्यकर्त्यांशी संवाद बैठक होत आहे. त्यानंतर ते छत्रपती संभाजीनगरचा दौरा करणार आहेत.

<><><><><>

देशाला समृद्ध आणि विकसित बनवण्यासाठी महाराष्ट्राचं योगदान महत्वाचं असल्याचं प्रतिपादन विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केलं. नवी दिल्ली इथं राष्ट्रकुल देशातल्या लोकप्रतिनिधी गृहांच्या पदाधिकाऱ्यांची १० वी परिषद सुरू आहे. यात शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासा संदर्भात विधानमंडळाची भूमिका या विषयावर आपलं मत मांडताना नार्वेकर बोलत होते. महाराष्ट्र हे वेगानं नागरीकरण होणारं राज्य असल्याचं नार्वेकर म्हणाले. राज्यात सार्वजनिक वाहतुकीचं विस्तारित जाळं, इलेक्ट्रिक वाहनं, गृहनिर्माण प्रकल्प उभारले जात असल्याचंही नार्वेकर यांनी सांगितलं. शहरांबरोबरच ग्रामीण भागात रोजगाराची संधी निर्माण करणं गरजेचं असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

एसटी महामंडळाच्या उत्पन्न वाढीसाठी जास्त उत्पन्न आणणाऱ्या चालक आणि वाहकांना एसटीतर्फे प्रोत्साहन भत्ता मिळणार आहे. त्यासाठी प्रत्येक फेरीसाठी उत्पन्नाचं उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या चालक वाहकांना उद्दिष्टापेक्षा वाढीव उत्पन्नापैकी २० टक्के रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणून दोघांना सम प्रमाणात दिली जाणार आहे. चालक-वाहकांची कामगिरी चांगली व्हावी यासाठी एक महिन्याकरता प्रायोगिक तत्वावर ही योजना महामंडळानं सुरू केली आहे.

<><><><><>

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या एका धावपट्टीवर येत्या ५ ऑक्टोबरला भारतीय हवाई दलाचं विमान उतरवण्याचं सिडकोचं उद्दिष्ट आहे. सिडकोचे

अध्यक्ष संजय शिरसाट यांनी आज नवी मुंबईत या विमानतळाच्या प्रकल्पाची पाहणी केल्यानंतर झालेल्या वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

विमानतळाच्या उभारणीचं काम अत्यंत समाधानकारक सुरू असून नवी मुंबईसह राज्याच्या आणि देशाच्या विकासाकरता हा प्रकल्प योगदान देणार आहे, त्यामुळे हवाई दलाचं विमान धावपट्टीवर उतरल्यानंतर मार्च महिन्यात देशांतर्गत तर जून महिन्यात आंतरराष्ट्रीय उड्डाणं सुरू करण्याचा सिडकोचा प्रयत्न असेल, असंही शिरसाट यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेजवळ छत्तीसगड राज्यातल्या नारायणपूर जिल्ह्यात काल झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. यात दंडकारण्य झोनल समितीचा सदस्य रुपेश मडावी याचा समावेश आहे. तो मागच्या वीस वर्षांपासून गडचिरोली जिल्ह्यात सक्रिय होता. हत्या, जाळपोळ करणं असे ६६ गुन्हे त्याच्यावर दाखल होते. लोकसभा निवडणुकीवेळी भामरागड तालुक्यातल्या कोठी इथल्या मतदान केंद्रावर हल्ला करण्यात रुपेश मडावी याचा सहभाग होता असं पोलीस अधिक्षक नीलोत्पल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

‘स्वच्छता ही सेवा’ अभियान सध्या देशभरात राबवलं जात आहे. या अभियानांतर्गत आज नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सर्व पाच बाजारपेठांमध्ये महास्वच्छता अभियान राबवण्यात आलं. नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी याबाबत माहिती दिली…

**होल्ड बाइट....डॉ. कैलास शिंदे (१७ सेकंद)**

**<><><><><>**

नैऋत्य मौसमी पावसाचा परतीचा प्रवास कालपासून देशात सुरू झाला आहे. आतापर्यंत राजस्थान, हरियाणा आणि गुजरातच्या काही भागातून हा पाऊस माघारी गेला आहे. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात राज्यातून हा पासून पूर्ण माघार घेईल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**<><><><><>**

हवामान विभागानं उद्या सकाळपर्यंत **मुंबईसाठी** यलो अलर्ट जारी केला आहे. **रायगड** जिल्ह्यात उद्यापर्यंत ऑरेंज अलर्ट तर **ठाणे** आणि **पालघरमध्ये** उद्यापर्यंत यलो अलर्ट जारी केला आहे. **मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकणात** काही ठिकाणी येत्या शुक्रवारपर्यंत मुसळधार पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारतीय महिला संघाने बुडापेस्ट इथं नुकत्याच झालेल्या बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकलं. या संघाचे मार्गदर्शक असणारे ग्रँडमस्टर अभिजित कुंटे यांचं आज पुणे विमानतळावर जल्लोषात स्वागत करण्यात आलं.

**//<><><><><>//**